लोकमत
महाराष्ट्राचा मानबिंदू
पुणे, मंगळवार, दि. १३ जून २०२३

# राष्ट्रीय विधायक संमेलन गुरुवारपासून

## दोन हजार आमदार होणार सहभागी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंटच्या वतीने 'राष्ट्रीय विधायक संमेलनाचे मुंबई येथे आयोजन करण्यात आले आहे. देशभरातील दोन हजार आमदार यात सहभागी होणार असून लोकशाही, प्रशासन, नेतृत्व आणि शांतताप्रिय समाज निर्माण करणे आदी विषयांवर चर्चा करण्यात येणार आहे, अशी माहिती संयोजक राहुल विश्वनाथ कराड यांनी पत्रकार परिषदेत दिली.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे प्र. कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे, आमदार माधुरी मिसाळ, संयोजन समिती सदस्य योगेश पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. लोकसभेच्या माजी सभापती सुमित्रा महाजन, डॉ. मीरा कुमार, शिवराज पाटील चाकुरकर, मनोहर जोशी तसेच लोकसभेचे सभापती ओम बिर्ला हे या संमेलनाचे मार्गदर्शक व संयोजक आहेत. मुंबई येथील बीकेसी जीओ सेंटर येथे दि. १५ ते १७ जून या कालावधीत आमदारांचे संमेलन पार पडणार आहे. ४० सत्र आणि विविध विषयांवर गोलमेज परिषद होईल.

### या विषयांवर चर्चा

सार्वजनिक जीवनातील ताणतणाव व्यवस्थापन, कल्याणकारी योजना : शेवटच्या व्यक्तीचे उत्थान, आर्थिक कल्याणासाठी तंत्रज्ञानाचा स्वीकार आणि कौतुकास्पद विधानपद्धती, आपला मतदारसंघ विकसित करण्याची कला व कौशल्य, आपली प्रतिमा तयार करा : साधने आणि तंत्रे यांसह सामाजिक कल्याणासाठी सहयोग : नोकरशहा आणि आमदार या विषयांवर चर्चा होणार आहे. तसेच गोलमेज परिषदेत भारत २०४७ : आमचे लक्ष, सर्वपक्षीय नेत्यांची चर्चा, राजकारणाचे अध्यात्मिकीकरण : अध्यात्मिक नेत्यांची चर्चा, अमृत कालमध्ये भारताचे परिवर्तन : व्यवसाय व उद्योग क्षेत्रातील लिडर्सची चर्चा, भारत २०४७ , विधिमंडळाचे कामकाज: आव्हाने आणि पुढील मार्ग, भारत २०४७: आमचे लक्ष, माध्यम २०४७ : भूमिका आणि जबाबदाऱ्या : संपादक आणि ज्येष्ठ पत्रकारांची चर्चा, कायदा आणि नागरिक २०४७ : आमचे लक्ष: कायदेशीर तज्ज्ञांची चर्चा करतील.



जनसंपर्क विभाग, माईर्स एमआयटी, पुणे.